# प्रकरण सहा

## निष्कर्ष व शिफारशी

## प्रकरण सहावे

## निष्कर्ष व शिफारशी

प्राचीन काळापासून काही अपवाद वगळल्यास स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले गेले आहे व आजही त्यामध्ये विशेष फरक पडलेला नाही. स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी अनेक योजना शासनाकडून राबविल्या गेल्या व जात आहेत. परंतु या योजनांचा फायदा जास्तीत जास्त शहरातील लोकांना, पुरुषांना व संघटित आहेत अशा लोकांनाच होतो. त्यामुळे ग्रामीण भागाला व विशेषता ग्रामीण स्त्रियांना विकासाचा अतिशय कमी लाभ झाला.

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये शेतमजूर स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक स्थिती-विषयी व शेतीतील कामासंबंधीअभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार ४९.६ टक्के स्त्रिया शेती क्षेत्रात काम करणाऱ्या आहेत. स्त्रियांचा ग्रामीण भागातील आर्थिक विकासातील सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. एकूणच स्त्रियांचे समाजातील, संसारातील, आर्थिक विकासातील स्थान महत्त्वाचे आहे. कारण देशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळ जवळ ५० टक्के लोकसंख्या स्त्रियांची आहे. शिवाय तिच्या अंगी चिकाटी, सहनशीलता, कष्टाळूपणा, इ. गुण असल्यामुळे सर्व अडथळ्यावर मात करून पुढे जाण्याचा ती प्रयत्न करते.

पण अजूनही तीला पूर्णपणे न्याय मिळत नाही. तिच्यावर अन्याय होतो. तिचे शोषण केले जाते. तिच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास करण्याची तिला पुरेशी संधी मिळत नाही. शेतमजूर अशिक्षित स्त्रियांची अवस्था तर याहून वाईट असते. ती मुक्यपणाने सर्व सोशित असते. अशा स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी म्हैसाळ "गावाची" निवड केली. कारण म्हैसाळ गाव संशोधिकेचे जन्मगाव

असल्याने, स्त्रियांच्या हालअपेष्टा जवळून पाहिलेल्या असल्याने त्यांच्यासाठी काहीतरी करता यावे या सदिच्छेने गावाची निवड केली.

प्रमुख निष्कर्ष:

प्रश्नावलीच्या आधारे घेतलेल्या मुलाखतीवरून अनेक गोष्टींचे स्पष्टीकरण झाले ते असे -

१) शेती क्षेत्रातील जवळ-जवळ सर्व प्रकारच्या कामामध्ये स्त्रियांचा सहभाग अधिक आहे. भांगलणीपासून ते उत्पादित माल स्वच्छ करण्यापर्यंतच्या सर्व कामामध्ये तिचा सहभाग महत्त्वाचा असतो. उसाला पाणी पाजणे, झाडे काढणे इ. अपवादात्मक कामे वगळता शेतीतील जवळ जवळ सर्व कामे शेतमजूर स्त्रिया करतात.

२) म्हैसाळ गावामध्ये शेतीला जलसिंचनाची सोय असल्यामुळे त्याचा शेती विकासावर चांगला परिणाम झालेला आहे. त्यांच्याकडे भरपूर शेती आहे. असा शेतकरी वर्ग सधन बनलेला आहे. मात्र शेतमजूरांना याचा म्हणावा तसा लाभ मिळालेला नाही. कारण त्यांच्या वेतनात फारसा फरक पडलेला नाही.

३) शासनाने एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री पुरुष दोघांनाही समान किमान वेतनदर ठरवून दिलेला आहे. मात्र अभ्यासक्षेत्राच्या पाहणीवरून असे दिसून येते की, शेतमजूराला किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळते. तसेच एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते.

४) "स्त्री" शेतमजुरांची मुख्य समस्या म्हणजे त्यांना मिळणारे वेतन हे त्यांच्या कामाच्या मनाने अत्यंत कमी आहे. हिवाळा, पावसाळा, उन्हाळा या वेगवेगळ्या ऋतूमध्ये काम करताना थंडी, पाऊस, उन्ह इ. नैसर्गिक आपत्तीशी

तोंड देत त्यांना काम करावे लागते. द्राक्ष बागा, ऊस शेती इ. ठिकाणी काम करताना स्त्रियांना जादा त्रास होतो. मात्र वेतन सर्व प्रकारच्या कामासाठी व सर्व हंगामात एकाच दराने दिले जाते. त्यांच्या संघटना नाहीत. त्यामुळे वेतनवाढीसाठी ते आंदोलन करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना प्रचलित वेतनदरावरच काम करावे लागते.

निष्कर्ष:

म्हैसाळ गावातील १०५ स्त्री शेतमजुरांच्या सर्वेक्षणाच्या आधारे खालील निष्कर्ष काढता येतील -

१) स्त्री शेतमजुरांमध्ये विवाहित स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे बहुतेक स्त्री मजूर २१ ते ५० या वयोगटातील आहेत.

२) कुटुंबातील सदस्यसंख्या ४ ते ६ असलेली कुटुंबे अधिक आहेत. ५ व्यक्तींचे कुटुंब योग्य आकारमानाचे मानल्यास अशी कुटुंबे सर्वाधिक ३७(३५.२४ टक्के) आहेत.

३) कुटुंबातील दोन सदस्य मिळविते असलेल्या कुटुंबाची संख्या सर्वात जास्त ५५ (५२.३९ टक्के) आहे. याचे प्रमुख कारण ८५ टक्के कुटुंबे विभक्त कुटुंब पध्दतीची आहेत. पती पत्नी दोघेही रोजगार करतात.

४) स्त्री शेतमजुरामध्ये मागासवर्गीय जातीच्या स्त्रिया सर्वाधिक ४९ (४६.६६ टक्के) आहेत. मात्र अलिकडे इतर जातीतील (मराठा, मुस्लिम, जैन) शेतमजुरांची संख्याही वाढू लागली आहे. मात्र मराठा, जैन, लिंगायत इ. जातीमध्ये स्त्रियांना रोजगारीसाठी पाठविणे, कमीपणाचे मानले जाते.

५) मुलाखतीवरून एक महत्त्वाची गोष्ट जाणवली ती म्हणजे स्त्री शेतमजुरांना कामासाठी सरासरी ४ कि.मी. पर्यंत चालत जावे लागते.

६) निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूरांपैकी फक्त ११ स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाच्या मालकीची जमीन आहे. तीही मत्कल्प (अर्धा ते २ एकर) आकार-मानाची व जिरोईत आहे. ९४ (८४.५३ टक्के) शेतमजूर भूहीन कुटुंबे आहेत.

७) निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजुरांपैकी फक्त २० (१९ टक्के) शेतमजूर स्त्रिया साक्षर आहेत. तसेच पुरुष साक्षरतेचे प्रमाणही कमी आहे. मात्र ५ वर्षांवरील १२२ मुलामुलीपैकी ११५ मुले, मुली साक्षर आहेत. याचाच अर्थ शेतमजूर स्त्रियांना शिक्षणाचे महत्व कळू लागले आहे.

८) निवडलेल्या क्षेत्रातील व निवडलेल्या स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबातील पुरुष शेतमजूरांना वर्षातून सरासरी २५९ दिवस तर स्त्रियांना सरासरी २०० दिवस शेतीमध्ये रोजगार मिळतो.

९) स्त्री शेतमजूरांना कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा मिळत नाहीत. तसेच पैशातील वेतनाव्यतिरिक्त वस्तुस्वरुपात काही मोबदला मिळतो. जसे ७७ (७३.३३ टक्के) स्त्री शेतमजुरांना जनावरांना चारा मिळतो. ५१ (४८.५७ टक्के) स्त्री शेतमजूरांना जळण मिळते. शिवाय वस्तु स्वरुपात काहीच मोबदला न मिळणारी १५ (१४.२८ टक्के) कुटुंबे आहेत.

१०) स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाना शेतमजूरी, स्वतःच्या शेतीतून, पशू-पालनापासून तसेच अन्य नोकरी (व्यवसायापासून उत्पन्न मिळते. मात्र या सर्वांमध्ये शेतमजुरी पासून मिळणारे सरासरी उत्पन्न सर्वात जास्त आहे. म्हणजे रु. ८०५०.५७ आहे.

११) शेतमजूर कुटुंबाच्या वार्षिक सरासरी खर्चापैकी सर्वात जास्त म्हणजे रु. ७१०३.८१ (७१.०६) खर्च हा अन्नधान्यावर होतो. त्याखालोखाल कपड्यावर खर्च होतो. कपडालत्ता, पादत्राणे, घरे, औषधपाणी, शिक्षण इ. गरजांवर अतिशय कमी खर्च केला जातो. कारण त्यांचे उत्पन्नच अपुरे असते.

१२) निवडलेल्या १०५ शेतमजूर कुटुंबापैकी ६० (५७.१२ टक्के) कुटुंबे बचत करतात. निवडलेल्या १०५ शेतमजूर कुटुंबाची वार्षिक सरासरी बचत रुपये १३६०.२६ आहे. बचत करणाऱ्या कुटुंबापैकी ४५ (७५ टक्के) कुटुंबानी आपली बचत भिशीमध्ये ठेवल्याचे दिसते.

१३) १०५ स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी ऋणग्रस्त शेतमजूर कुटुंबे १८ आहेत. शेतमजूर कुटुंबाचे सरासरी कर्ज रु. ४९०.४७ होते.

१४) ७७ टक्के स्त्रियानी मजुरीचे काम करण्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळते असे सांगितले. ९५ (९०.४८ टक्के) स्त्रियांनी जातीभेद जाणवला नाही. ७८ (७४.२८ टक्के) स्त्रियांना शिक्षणाबद्दल आवड आहे. ६३ (६० टक्के) स्त्रियांना प्रौढ शिक्षणात सहभागी होण्याची इच्छा दर्शविली. ८४ (८० टक्के) स्त्रियांनी हुंडा प्रथेला विरोध दर्शविला. आंतरजातीय विवाहाबद्दल प्रतिकूल मत असल्याचे जाणवले. ८७ (८२.८५ टक्के) स्त्रियांनी याला विरोध दर्शविला. बहुतेक सर्व स्त्रियांची आपल्या मुलांना शिक्षण देण्याची इच्छा असल्याचे दिसले.

१५) कुटुंबनियोजनाबाबत शेतमजूर स्त्रियांच्यात जागृती निर्माण होत आहे. मात्र कुटुबनियोजनाच्या सर्व साधनांची माहिती त्यांना विशेष नाही. एकूण १०५ शेतमजूर स्त्रियापैकी ८५ स्त्रियांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केलेली आहे. याचे प्रमुख श्रेय सरकारी दवाखान्यानी राबविलेल्या कुटुंबनियोजन कार्यक्रमाला द्यावे लागेल.

<u>शिफारशी:</u>

शेतमजूरांची आर्थिक, सामाजिक, राजकीय, परिस्थिती सुधारावी म्हणून सरकारने अनेक उपाय योजले आहेत. असे असूनही शेतमजूरांच्या परिस्थितीत विशेष फरक पडत नाही. याचे कारण असे की, जरी उपाययोजना चांगल्या असल्या तरी या कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्यपणे होत नाही. त्यामध्ये

अनेक त्रुटी व दोष आहेत. तेव्हा शेतमजूरांसाठी जे कार्यक्रम राबविले जातील त्यांची अंमलबजावणी कार्यक्षमपणे करावी.

याशिवाय इतर काही शिफारशी खालीलप्रमाणे -

१) स्त्री शेतमजूरांना वर्षभर रोजगार मिळत नाही. त्यांच्या बेकारीचे प्रमाण पुर्णपणे नाहीसे करता येणार नाही. मात्र ते कमी करण्यासाठी बिगर शेती क्षेत्रात रोजगार निर्मिती करुन दिली जावी. जसे हस्त-व्यवसाय, लघुउद्योग, कुटीरोद्योग, जोडउद्योग इ.

२) सहकारी तत्वावरील वस्तुबाजराप्रमाणे श्रमबाजारही सहकारी तत्वावर सुरु करावा. त्यासाठी श्रमिकांच्या सहकारी संस्था स्थापन कराव्यात. यासाठी सुशिक्षित स्त्रियांनी, वेगवेगळ्या स्वयंसेवा संघटनांनी पुढाकार घ्यावा.

३) शासनाच्या बहुतेक योजनांचा लाभ आर्थिक दृष्टया सबळ लोकांनाच मिळतो. जरी आर्थिकदृष्टया दुर्बलासाठी या योजना असल्या तरी त्यांचा फायदा सबळ लोकच घेत असतात. तेव्हा असे न होता. शेतमजूरांसाठी, स्त्री शेतमजूरांसाठी ज्या योजना राबविल्या जातात व भविष्यात ज्या राबविल्या जातील त्यांची कार्यक्षमपणे व काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

४) ग्रामीण स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. त्यासाठी सुशिक्षीत महिलांनी पुढाकार घेतला पाहिजे.

५) स्त्रियांना बिगरशेती क्षेत्रात रोजगार उपलब्ध होण्यासाठी ग्रामीण भागात स्त्री रोजगारीला प्राधान्य देणारे छोटे-छोटे कुटीरद्योग, हस्तोद्योग सुरु करावेत.

६) शेतीक्षेत्रात किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी केली जाते की, नाही याची काटेकोरपणे पहाणी केली जावी.

७) संघटित क्षेत्रातील कामगारांना जे लाभ मिळतात ते सर्व स्त्री शेतमजूरांनाही मिळावेत. उदा. सामाजिक सुरक्षा, विमा, रजा, निवृत्ती वेतन इ.

८) स्त्री शेतमजूरांच्या संघटना स्थापन केल्या जाव्यात.

९) स्त्री शेतमजूरांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी राज्यपातळीवर समित्या नेमाव्यात व त्यांच्या शिफारशी विचारात घेऊन स्त्री शेतमजूर विकास कार्यक्रम राबवावा.

.....